**जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली (रोजगार हमी योजना शाखा) येथे सन 2020-21 व सन 2021-2022 या टंचाई कालावधीसाठी (दि.01/01/2021 ते दि.30/09/2022 अखेर) पाणी पुरवठ्यासाठी खाजगी ट्रक / टँकर भाड्याने घेणेबाबत ई-निविदा तांत्रिक लिफाफ्यात समाविष्ट करावयाची कागदपत्रे**

........................................................................................................................................

**परिशिष्ट 'अ'**

सांगली जिल्हयातील पाणी टंचाईग्रस्त भागात टँकरने पाणी पुरवठा करणेची ई-निविदा मागविणेत येत असून www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत आली आहे. सदर निविदा ही व्दिलिफाफा पध्दतीची असून पहिल्या लिफाप्यास **"तांत्रिक लिफाफा क्र. 1"** असे संबोधण्यात येईल. तसेच त्यामध्ये खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करावीत. सदरची कागदपत्रे ही स्कॅनींग करून ऑनलाईन भरावीत तसेच त्यांच्या मुळ प्रती या दिनांक 11/01/2021 रोजी दुपारी 5.00 पुर्वी या कार्यालयाकडे सिलबंद लखोटा करून जमा करणेची आहेत.

1) निविदा फॉर्म फी किंमत रु. 5000/- नेट बँकिग पध्दतीने भरल्याबाबतची रिसीट व बयाणा रक्कम रु.5,00,000/- (अक्षरी रु. पाच लाख फक्त) ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक राहील. त्याची प्राप्त झालेली रिसीट सादर करणे आवश्यक राहील. (स्कॅन स्वरुपात)
2) वित्तीय वर्ष सन 2016-17, 2017-18, 2018-19 मधील आयकर विवरणपत्र सादर केलेची पोहोच.
3) वैयक्तीक निविदाकार यांनी त्यांचे नावे असलेले चालू स्थितीतील किमान 10 टँकर्स, किंवा निविदाकार संस्था यांनी त्यांचे नावे असलेले चालू स्थितीतील किमान 10 टँकर्स असणे आवश्यक आहेत. त्यांनी त्यांचे नावे असलेले किमान 10 टँकरचे क्रमांक टँकर मालकाचे नाव व वाहनाचे सर्व कागदपत्रे ही ऑनलाईन सादर करणेची आहेत. तसेच त्यांची मुळ कागदपत्रे ही निविदा उघडणेच्या दिवशी पडताळणी करणेसाठी या कार्यालयास हजर करावीत.
4) स्वतःच्या मालकीच्या असलेल्या किमान 10 (दहा) वाहनांची ई-निविदा पत्रकामध्ये दिलेल्या विहित नमुन्यात माहिती द्यावी.
   अ) प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडे वाहनांची नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र (आर सी बुक प्रती)
   ब) वाहनाचे वाहन कर व विमा भरणा केलेबाबतचे प्रमाणपत्र
   क) टँकर / ट्रक सुस्थितीत असल्याबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे फिटनेस प्रमाणपत्र व टॅक्स भरणा केलेचे प्रमाणपत्र
5) भागीदारी संस्था असल्यास सहायक निबंधक भागीदारी संस्था यांचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत व संस्थेचा दोन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल (मत्ता - दायित्वासह) भागीदारी संस्था असल्यास सक्षम प्राधिकारी यांचे नोंदणी प्रमाणपत्र दोन वर्षाच्या लेखा परिक्षण अहवालासह, बायलॉज सोबत जोडावे तसेच संस्थेचे रोख भांडवल किती उपलब्ध आहे, त्याचा तपशील जोडावा. सहकारी संस्था असलेस संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, भाग भांडवल प्रमाणपत्र, मागील दोन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल, बायलॉज इत्यादी कागदपत्रे सोबत जोडावे
6) यापुर्वी महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्हयात मागील 3 वर्षापैकी कोणत्याही एका वर्षात टँकरने पाणी पुरवठा केलेबाबत संबधीत जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांचे स्वाक्षरीचे किमान 1 वर्षाचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र.
7) मंजूर निविदाकारांनी त्यांचे नावे किंवा त्यांचे अधिपत्याखालील सर्व टँकर्सला स्वखर्चाने जी.पी.एस. सिस्टिम बसवत असलेबाबत र.100/- च्या स्टॅम्प पेपरवरील हमीपत्र.
8) निविदेबाबतच्या सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबत निविदा फॉर्म मधील परिशिष्ट " अ व ब" च्या प्रतिसह रु. 100/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र.

ऑनलाईन निविदामध्ये दराच्या फॉर्मवर आपले दर देणेचे आहेत. तसेच दराबाबत कार्यालयाकडून वितरीत करणेत आलेला विहीत व परीपुर्ण भरलेला फॉर्म (परिशिष्ट - क) व निविदाकाराचे स्वंयघोषणा पत्र (परिशिष्ट 'ड') सिलबंद लिफाप्यात सादर करावे, त्यास दराचा **व्यापारी लिफाफा क्र.2** असे संबोधण्यात येईल.

सदर दोन्ही लिफाफे एका मोठया लिफाप्यात सिलबंद करून त्यावर टँकरने पाणी पुरवठा निविदा 2020-21 व 2021-22 (दि.01/01/2021 ते दि.30/09/2022 अखेर) असे नमूद करून निविदा धारकाचे नाव व पत्ता नमूद करणेत यावे .

स्थळः सांगली

दिनांक -

निविदाकाराची स्वाक्षरी -

निविदाकाराचे नाव व पत्ता -

मोबाईल नंबरः-

## सन 2020-21 व सन 2021-22 या टंचाई कालावधीसाठी (दि.01/01/2021 ते दि.30/09/2022 अखेर) पाणी पुरवठयासाठी खाजगी ट्रक / टँकर्स भाडयाने घेणे कामी अटी व शर्ती

..........................................................................................................................................

### परिशिष्ट - ब

| अ.क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| 1 | पिण्याचे पाण्याचा पुरवठा करण्यासाठी ट्रक/टँकर्स भाड्याने घेण्यासाठी शासन मान्य दर खालीलप्रमाणे आहेत. त्या दरापेक्षा कमी दराने पिण्याचे पाण्याचा पुरवठा करण्यास तयार असलेल्या कंत्राटदाराकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा पत्रात सदर दर भरुन द्यावे लागतील. शासन निर्णय क्र.टंचाई/2018/प्र.क्र.167/पापु-14 दि.19/12/2018 नुसार टँकर/ट्रकवर बसविलेल्या पाण्याच्या टाकीच्या पाणी वाहून नेण्याच्या क्षमतेनुसार 1 मे.टन या एककामध्ये **(Unit)** साठी विहित केलेले दर खालील प्रमाणे आहेत.<br><br>**अ.क्र.** — 1; **टँकर्सची क्षमता** — 1 मे.टन; **प्रतिदिन कमाल भाडे (टँकर क्षमतेनुसार)** — रु. 270.00; **प्रति किलो मिटर कमाल भाडे** — रु. 3.40<br><br>**<u>वरील दरापेक्षा ज्याचे दर कमी असतील अशाच कंत्राटदाराच्या दरांचा विचार करण्यात येईल.</u>** |
| 2 | वाहन पुरविणेसाठी आदेश दिले नंतर वाहन धारकांने आदेशीत केलेल्या ठिकाणी 10000 लिटर्स किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेचे टँकर्स 24 तासाचे आत पुरविणेचे आहेत. ट्रक्स किंवा टँकर्समध्ये वरील क्षमतेच्या टाक्या वाहनधारकानी बसवून वाहन पुरविणेचे आहेत. स्पष्ट आदेश नसताना वाहने तयार ठेवल्यास त्याबाबत मोबदला देता येणार नाही. |
| 3 | निविदा धारकाने मागील तीन वर्षाचे (सन 2016-17, 2017-18, 2018-19) आयकर भरल्याचे विवरणपत्र, र.रु. 50 लाखाचे वर उलाढाल असलेबाबत सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करावे. तसेच पॅनकार्डची साक्षांकित प्रत सादर करावी. |
| 4 | जिल्हयातील गावे /वाडया वस्त्यावर पाणी पुरवठा करण्याबाबत आदेश दिला जाईल. त्या ठिकाणी त्यांनी विनाखंड पाणी पुरवठा करणेचा आहे. याबाबत निविदाधारकास कोणताही बदल मागता येणार नाही. अथवा तक्रार करता येणार नाही. टँकरवर जिथे पाणी भरावयाचे ठिकाणी पाणी भरणेकरीता व जिथे पाणी वाटप करावयाचे आहे त्याठिकाणी पाणी वाटप करणेकरीता पूर्ण सुविधा निविदाधारकाने उपलब्ध करुन देणेच्या आहेत. |
| 5 | वाहनावर काम करणारा चालक, मदतनीस याचे पगार व भत्ते, इंधन, वाहनाची देखभाल व दुरूस्ती वरील खर्च अथवा अन्य कोणताही प्रकारचा खर्च वाहन धारकाने करणेचा आहे. यासाठी शासनाकडून आगावू रक्कम मिळणार नाही. वाहन चालकाचे जड वाहन चालविणेचे अनुज्ञप्ती विधीग्राहय असणे आवश्यक आहे. वाहनावर चालकाव्यतिरिक्त कमीत कमी एक मदतनीस असणे आवश्यक आहे. |

Nested table in item 1:

| अ.क्र. | टँकर्सची क्षमता | प्रतिदिन कमाल भाडे (टँकर क्षमतेनुसार) | प्रति किलो मिटर कमाल भाडे |
|---|---|---|---|
| 1 | 1 मे.टन | रु. 270.00 | रु. 3.40 |

| अ.क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| 6 | ज्या कंत्राटदाराचे दर मान्य केले जातील त्यांना सेक्युरिटी डिपॉझीट रु. 15,00,000/- (अक्षरी रु.पंधरा लाख मात्र) ठेवावे लागेल. सदरचे डिपॉझिट राष्ट्रीयकृत बँकेचा डी डी किंवा **FDR** (फिक्स डिपॉझिट रिसीट)/बँक गॅरंटी जिल्हाधिकारी सांगली यांचे नावे निविदा मंजूर झाल्यानंतर 15 दिवसांचे आत जमा करावा लागेल. निविदा एकापेक्षा जास्त निविदाधारकास विभागून मंजूर करण्यात आल्यास प्रत्येक निविदाधारकास सुरक्षाठेव म्हणून स्वतंत्रपणे डी डी किंवा **FDR** (फिक्स डिपॉझिट रिसीट) /बँक गॅरंटी स्वरुपात रक्कम देणे बंधनकारक राहील. |
| 7 | खाजगी माऊन्टेड टँकरना प्राधान्य देण्यात येईल 10 मे टन व 12 मे टन क्षमतेचे खाजगी टँकर उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. जर वर विहित केलेल्या क्षमतेचे माऊन्टेड टँकर उपलब्ध न झाल्यास तसेच खाजगी ट्रक्सवर टाकी ठेवून त्याचे रुपांतर टँकरमध्ये केल्यास प्रत्येक ट्रकची पाणी वाहण्याची क्षमता व तो ट्रक प्रत्यक्षात किती पाणी वाहतो हे लक्षात घेवून निश्चित केलेल्या दराच्या प्रमाणात खाजगी ट्रकला भाडे देण्यात येईल. |
| 8 | पाणी वाहतूकीसाठी आवश्यक असणा-या 10000 लिटर्स/12000 लिटर्स च्या लोखंडी टाक्या निविदाधारकास स्वतःच आणाव्या लागतील. व याबाबत वेगळे भाडे दिले जाणार नाही. वाहनावर बसविण्यात येणा-या टाक्या चढविणे, उतरविणे व त्याच्या मजबूतीसाठी वेल्डिंग करणे, पाणी पुरवठ्यासाठी तोट्या बसविणे इ.साठीचा संपूर्ण खर्च निविदाधारकास सोसावा लागेल. त्याची भरपाई निविदाधारकास दिली जाणार नाही. टँकर टाकीमधून पाणी वाटप करण्यासाठी किमान 6 नळ व तोटया टँकरला बसविणे आवश्यक आहे. |
| 9 | पाणी भरणेचे ठिकाण संबधीत पंचायत समिती/उपअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा यांचे कार्यालयामार्फत ठरविण्यात / दर्शविणेत येईल. दर्शविलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून पाणी पुरवठा केला तर त्याचे सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहील व त्याचे भाडे दिले जाणार नाही. |
| 10 | निविदा फॉर्मची किंमत रु.5000/- असून निविदा संकेतस्थळावर रक्कम भरुन पावती डाउनलोड करणे आवश्यक आहे. |
| 11 | शासकीय कामासाठी जिल्हाधिकारी आदेशीत करतील तेव्हा सांगली जिल्हयात कोणत्याही ठिकाणी व कोणत्याही वेळी टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे निविदाधारकास बंधनकारक राहील. तसेच वाहन केंव्हा चालू व बंद करावयाचे या बाबत अंतिम अधिकार जिल्हाधिकारी /उपविभागीय अधिकारी /तहसिलदार यांचेकडे राहतील याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही. |
| 12 | पाणी पुरवठयासाठी टँकर तालुक्यात पाठविले नंतर संबधीत उपविभागीय अधिकारी/तहसिलदार /गटविकास अधिकारी यांनी ठरवून दिलेल्या ठिकणी व वेळेमध्ये विनातक्रार पाणी पुरवठा करणेचा आहे. तसेच वाहन किमान 12 तास चालवावे लागेल. वाहन चालविण्याचे तास वेळा संबधित तहसिलदार /गटविकास अधिकारी यांनी दिलेल्या नियोजनाप्रमाणे राहतील. निविदाधारकास निविदेच्या कालावधीत दररोज काम देणे बंधनकारक राहणार नाही. सांगली जिल्हयात निर्माण होणा-या परिस्थितीनुसार आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी सांगली यांना राहील. |
| 13 | वाहन क्षमतेबाबत वजन मापे खात्याकडील व प्रवासाच्या किलोमीटर अंतराबाबत बांधकाम खात्याचे किंवा एस टी महामंडळाच्या सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र अंतिम धरले जाईल. |
| 14 | प्रत्यक्ष पाणी पुरवठा केलेल्या कामाबाबत ज्या ठिकाणी वाहन दिले जाईल. त्या गावचे तलाठी /ग्रामसेवक /सरपंच / पोलीस पाटील /ग्रामीण पाणी पुरवठा सदस्य यांचेपैकी कोणाही दोघांचे सहीचा दैनंदिन पाणी पुरवठा दाखला तालुकेचे गटविकास अधिकारी यांचेकडे हजर करणेचा आहे. |

| अ.क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| 15 | पाणी पुरवठयासाठी केलेल्या प्रवासाच्या नोंदी लॉगबुकात नोंदवून संबधीत गटविकास अधिकारी किंवा संबधित उपअभियंता, पंचायत समिती यांचेकडून साक्षांकित करून घेणेचे आहे. सदरचे लागू पुरते उतारे किंवा प्रमाणपत्र हजर केले शिवाय पेमेंट, बिल अदा केले जाणार नाही. |
| 16 | आगावू भाडे मिळाले नाही अगर भाडेची देय रक्कम मिळाली नाही या कारणास्तव टॅंकर बंद ठेवलेस निविदाधारकांचा टॅंकर पुरविणेचा करार विना नोटीस रद्द करणेत येईल. |
| 17 | तहसिलदार /गटविकास अधिकारी यांनी नियोजनाने ठरवून दिलेल्या वेळेप्रमाणे टॅंकर चालू न ठेवल्यास निविदा करार विना नोटीस रद्द करण्यात येईल. |
| 18 | निविदेसोबत दिलेल्या स्वमालकीच्या 10 टॅंकर बरोबरच, पुरविण्यात येणा-या अन्य चालू स्थितीतील टॅंकर्सची यादी (टॅंकर क्रमांक मालकाचे नाव व वाहनाचे कागदपत्राची छायांकित प्रतीसह ) सादर करणे बंधनकारक राहील. |
| 19 | शासनस्तरावरुन, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार , गटविकास अधिकारी वेळोवेळी जे निर्देश देतील अथवा नवीन अटी व शर्ती लावतील त्यांचे पालन करणे निविदाधारकास बंधनकारक राहिल. |
| 20 | वाहन यांत्रीकदृष्टया चांगल्या स्थितीत असून पाणी पुरवठा/ पाणी वाहतूक कामासाठी वापरण्यात योग्य असल्याबाबतचे, उपप्रादेशीक परिवहन अधिकारी सांगली यांचे प्रमाणपत्र, वाहन धारकाने हजर करणेचे आहे. जर वाहन बाहेर राज्यातील असेल तर, वाहनाचा महाराष्ट्र राज्याचा कर भरलेला असणे व विधीग्राहय परवाना असणे आवश्यक आहे. |
| 21 | निविदामध्ये वाहनाचा दर (प्रति वाहनाच्या पाणी वाहन करणेच्या क्षमतेनुमार प्रति दिन भाडे + प्रति कि.मी. दर नमूद केलला असावा) अशा दराने जास्तीत जास्त किती वाहने पुरविली जातील हे ही नमूद करणे आवश्यक आहे. शासन परिपत्रक क्र.टंचाई-3003/प्र.क्र.14/पापु.-14 दि.27/01/2003 नुसार निविदाधारकाकडे स्वतःचे किती टॅंकर्स / ट्रक्स आहेत, तो समाधानकारक रित्या काम करु शकेल की नाही याची खात्री करुनच निविदा मंजूर करणेत येईल. याबाबत कोणताही आक्षेप मान्य केला जाणार नाही. |
| 22 | किमान दराची निविदा स्विकृत होणा-या निविदाधारकाकडे किती टॅंकर्स आहेत. त्याच प्रमाणे मागील पाच वर्षामध्ये किती टॅंकर्स लागले व निविदेच्या कालावधीमध्ये अंदाजे किती टॅंकर्स लागतील या अनुमानानुसार, स्विकृत निविदा धारक तितके टॅंकर्स पुरविणेस समर्थ नसले तर इतर निविदा धारकांशी वाटाघाटी करून ते जर किमान स्विकृत दराने टॅंकर्स पुरविणेस तयार असतील तर आवश्यकता प्रमाणे चांगल्या सनियंत्रणासाठी त्यांना टॅंकरने पाणी पुरवठा करणेचे विभागून देण्यात येईल. |
| 23 | टॅंकर्सद्वारे पाणीपुरवठा चालू असतांना वाहनाची गळती व नादुरुस्ती झालेस खेप रद्द समजणेत येईल. |
| 24 | टॅंकर निविदा कालावधी जिल्हाधिकारी यांच्या अधिकारात आवश्यकतेप्रमाणे निश्चित करणेत येईल. या बाबतचा अंतिम अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील. याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही. |
| 25 | टॅंकर आवश्यकतेनुसार घेतले जाणार असलेने निविदेमध्ये सर्व टॅंकर्स घेणेची जबाबदारी जिल्हाधिकारी यांचेकडे राहणार नाही. टॅंकर्स जसजसे ज्यावेळी लागतील तस-तसे त्यावेळी आवश्यकतेनुसार व आवश्यक असतील तितकेच टॅंकर्स घेतले जातील. |

| अ.क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| 26 | मोटार वाहन वाहतूक नियम निविदा धारकास बंधक कारक राहतील. वाहनाचे आर सी बुक, टॅक्स बुक, विमा प्रमाणपत्र, योग्यता प्रमाणपत्र, PUC प्रमाणपत्र हे विधीग्राह्य असणे आवश्यक आहे. |
| 27 | पाणीपुरवठयासाठी आदेशीत वाहनाने काही अपघात केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकावर राहील, त्यासाठी शासनाकडून कोणतीही नुकसान भरपाई देण्याचे जिल्हाधिकारी यांचेवर बंधन कारक नाही. तसेच वाहन ना दुरुस्त झाल्यास, इंधनाअभावी व इतर कोणत्याही कारणामुळे पाणी पुरवठ्याचे काम न करता वाहन उभे राहिलेस त्याचे भाडे अथवा नुकसान भरपाई दिली जाणार नाही. |
| 28 | टँकरला मंजूर करण्यात येणारे प्रति दिन भाडे हे सदर टँकरना नियोजनाप्रमाणे प्रति दिन मंजूर करण्यात आलेल्या एकूण खेपासाठीचे असेल, कोणत्याही कारणास्तव मंजूर खेपापेक्षा कमी खेपा टाकलेस प्रति दिन भाडे त्या प्रमाणातच अदा करणेत येईल याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही. |
| 29 | मंजूर निविदाकारांनी त्यांच्या किंवा त्यांच्या अधिपत्याखालील सर्व सुरू असणा-या किंवा सुरू होणा-या सर्व टँकर्सना GPS based Water Tanker tracking and monnitoring system स्वखर्चाने बसवावी लागेल व त्यावरील मासिक सेवाशुल्काची रक्कम निविदाकाराने अदा करावयाची आहे. सदर प्रणालीद्वारा तयार होणारे विविध स्वरुपाचे अहवाल जिल्हाधिकारी आणि सर्व संबधीत अधिकारी यांना ऑनलाईन प्रतिदिनी व हार्डकॉपीमध्ये प्रत्येक महिन्याला उपलबध करुन द्यावे लागतील. त्याचा स्वतंत्र खर्च शासनाकडून मागणी करता येणार नाही. GPS प्रणाली नसलेला टँकर वापरल्यास त्यावर कायदेशीर कारवाई करणेत येईल. या व्यतिरिक्त प्रतिदिन प्रति टँकर रु.10000/- इतका दंड आकारण्यात येईल. GPS अहवालानुसार व शासन नियमानुसार वाहनाचे भाडे वितरीत करणेत येईल. |
| 30 | GPS प्रणाली लावलेला टँकर वापरत असताना सदर प्रणाली कोणत्याही कारणास्तव बंद पडल्यास अथवा कोणत्याही कारणामुळे मागणी केलेला GPS व सॉफ्टवेअरद्वारे जनरेटेड अहवाल प्राप्त होवू न शकल्यास अथवा या प्रणालीमध्ये कोणत्याही प्रकारचा बिघाड झाल्यास प्रतिदिन प्रति टँकर रु.5000/- इतका दंड आकारण्यात येईल. हा प्रकार सततचा आहे असे वाटल्यास सदर निविदा / करार रद्द करणेचा अधिकार जिल्हाधिकारी सांगली यांना राहील. |
| 31 | प्रत्येक तालुक्यासाठी सुरू असणा-या टँकर्सच्या प्रमाणात 10 टक्के टँकर्स राखीव ठेवणे आवश्यक आहे. सदरचे टँकर्स हे आवश्यकतेनुसार तात्काळ लावता येणे शक्य व्हावे. या करीता ही तरतूद केली आहे. ज्या दिवसापासून राखीव टँकर्स पाणी पुरवठा वाटपासाठी कार्यरत केली जाईल. त्या दिवसापासून त्यांचे नियमीत देयक अदा केले जातील. मात्र राखीव ठेवलेल्या व काम न केलेल्या दिवसाचे भाडे किंवा देयक अदा केले जाणार नाही. |
| 32 | निविदा धारकांकडून वरील पैकी कोणत्याही अटींचा भंग झाल्यास निविदा धारकास दिलेले काम काढून घेणेचा अधिकार जिल्हाधिकारी सांगली यांना असून निविदा धारकाने निविदेसोबत जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल, मंजूर निविदा रद्द करणेत येईल, अशा निविदा धारकाचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करणेत येईल व त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करणेत येईल. तसेच निविदा पुन्हा मागविल्यास व निविदेचा जादा दर आल्यास जादा दराची वसुली त्यांचेकडून केली जाईल. |
| 33 | कंत्राटदारांचा कालावधी 1 जानेवारी 2021 ते 30 सप्टेंबर 2022 या मुदतीपर्यंत अंमलात राहील. तथापि या कालावधीच्या अगोदर किंवा नंतर गरज वाटल्यास आवश्यकतेनुसार मान्य दरांवर पात्र निविदाधारकाला टँकर पुरवठा करावा लागेल. |

| अ.क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| 34 | वाहनावरील टाक्याची स्वच्छता राखणे, टाक्यावर घट्ट झाकण लावणे, टाकी व झाकण दुरुस्त ठेवणे, पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठा करणे, टँकर, टाकी गळके राहणार नाहीत तसेच वाहनासोबत वाहनचालक, वाहनास लागणारे इंधन यासाठी कंत्राटदार जबाबदार राहील. |
| 35 | टँकरच्या दर्शनी भागावर सदर टँकर कोणत्या गावांसाठी सुरु आहे. त्या गावांचे नांव, मार्ग, टँकर भरण्याचे ठिकाण, खेपांची संख्या, ड्रायव्हरचे नांव, मोबाईल नंबर इ. तपशील नमूद केलेला फलक स्वखर्चानी लावावा. |
| 36 | प्रत्येक वाहनाची रोजनिशी (लॉगबुक) संबधीत गावचे ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी ठेवतील व वाहनाचे किलोमीटर वरुन झालेल्या रिडींग वरुन लॉगबुकात नोंद घेतील व हे लॉगबुक संबधित गटविकास अधिकारी यांनी शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. 1002/प्र.क्र290/पापु-14 दि.19 सप्टेंबर 2002 व शासन परिपत्रक क्र.टंचाई-1005/प्र.क्र.305/पा.पु.14 दि. 24 जानेवारी 2006 मधील तरतुदीनुसार प्रमाणित करुन घ्यावे लागेल. टँकरचे लॉगबुक पाणी पुरवठा केल्याबाबत ग्रामस्थ महिलांचे स्वाक्षरीचे रजिस्टर व जीपीएस प्रणालीनुसार पाणी पुरवठ्याचा तपशिल इ.बाबी तपासून त्यानुसार टँकरच्या बिलाची रक्कम अदा केली जाईल. जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी वेळोवेळी ज्या नमुन्यात सांगतील त्या नमुन्यात रेकॉर्ड ठेवावे लागेल. विशेषतः वाहनावरील लॉगबुक, स्त्रोताजवळील रजिस्टर, गावातील रजिस्टर इ. जिल्हाधिकारी ठरवून देतील त्या नमुन्यात स्वखर्चाने रजिस्टर्स ठेवावे लागतील तसेच हे सर्व रजिस्टर्स जिल्हाधिकारी ठरवतील त्या प्राधिका-याकडून प्रमाणित करुन घ्यावी लागतील. |
| 37 | वाहनांचे भाडे शासनाकडून जसजसे अनुदान उपलब्ध होईल त्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सांगली यांचेकडे वर्ग करुन संबधीत गटविकास अधिकारी यांचे मार्फत नियमानुसार वितरीत करण्यात येईल. |
| 38 | अ) जिल्हाधिकारी अथवा प्राधिकृत अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर 24 तासाच्या आत पाणी पुरवठा न केल्यास किंवा विलंबाने केलेल्या प्रतिदिन प्रति टँकर रु.10,000/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) किंवा जिल्हाधिकारी निश्चित करतील त्या दराने दंड आकारुन वसूल करणेत येईल.<br>ब) तसेच कोणत्याही दिवशी टँकरने मान्य खेपापेक्षा कमी खेपा केल्यास त्याबाबत प्रत्येक खेपेसाठी रु.2000/- चा दंड आकारणेत येईल.<br>क) टँकर बंद पडलेस अन्य टँकरने पाणी पुरवठा करणे बंधनकारक राहील. |
| 39 | जिल्हाधिकारी अथवा प्राधिकृत अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर पाणी पुरवठा न केल्यास अथवा पाणी पुरवठ्याचे काम असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास किंवा निविदेतील कोणत्याही अटीचा भंग केल्यास कंत्राटदारास दिलेले काम काढून घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी, सांगली यांचा राहील व पाणी पुरवठ्यासाठी दुस-या कंत्राटदाराकडून काम करुन घेतले जाईल. त्या प्रित्यर्थ मंजूर दरापेक्षा ज्यादा लागणारा जास्तीचा खर्च व फरकाची रक्कम मूळ कंत्राटदाराकडून वसूल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी सांगली यांना राहील. अगदी एकाही अटी शर्तीच्या भंगामुळे करारनामा रद्द करुन वरीलप्रमाणे कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना राहतील. |
| 40 | शासनाचे आदेशानुसार व नियमानुसार आयकर व त्यावरील सरचार्ज रक्कम देय बिलातून परस्पर कपात करण्यात येईल. आयकर खात्याने आयकर अथवा व्याजाची अथवा दंडाची मागणी केल्यास त्यांची भरपाई ठेकेदारास करावी लागेल. तसेच बिलातून 2 टक्के दराने जीएसटी वसूल केला जाईल. |

| अ.क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| 41 | जर दोन किंवा अधिक ठेकेदारांनी निविदेमध्ये दिलेले दर सारखेच असतील तर जिल्हाधिकारी यांना प्राप्त निविदेपैकी कोणतीही ई-निविदा स्वीकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार राहील. त्यांनी घेतलेला निर्णय अंतिम राहील. न्यूनतम दर ठरलेल्या (L1) निविदाधारकांना जिल्हाधिकारी सांगली दराच्या वाटाघाटीसाठी बोलवू शकतील. तसेच प्राप्त निविदेपैकी कोणतेही/ कोणत्याही निविदा स्विकृत करण्याचा व कोणतेही कारण न देता निविदा रद्द करणेचे अधिकार जिल्हाधिकारी सांगली यांनी राखून ठेवले आहेत. |
| 42 | निविदाधारकांनी निविदेत नमूद केलेल्या दरांचा तुलनात्मक अभ्यास करुन विविध प्रत्येक क्षमतेत सर्वात कमी प्रतिदिन व प्रति किमी दर येणा-या दोन किंवा त्यापेक्षा अधिक निविदाधारकास जिल्हाधिकारी सांगली वाटाघाटीसाठी किंवा दर कमी करण्याची शक्यता आजमावून पाहणेसाठी बोलावू शकतील. |
| 43 | निविदाधारकांनी पाणी पुरवठ्यासाठी वापरणेत येणा-या वाहनांची नंबरसहीत-क्षमतेसहीत यादी जोडणे आवश्यक राहील. जिल्हयातील टंचाई परिस्थिती लक्षात घेता अशा परिस्थितीत जिल्हाधिकारी निविदाधारकांना कामासाठी मुदतवाढ देवू शकतात अथवा मुदत कमी करु शकतील. मुदतवाढ मिळाल्यास काम करणे ठेकेदारांवर बंधनकारक राहील. |
| 44 | जिल्हयाच्या कोणत्याही भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करतांना द्यावा लागणा-या पथकराची जबाबदारी निविदाधारकाची असेल. |
| 45 | ई-निविदा संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील व तो निर्णय अंतिम राहील याची कक्षा सांगली जिल्हा राहील. |
| 46 | दराची निविदा उघडलेनंतर एका निविदेमधील प्रतिदिन प्रति मेट्रीक टन भाडे व दुस-या निविदेमधील प्रति कि.मी दर यामध्ये कमी जास्त दर आल्यास निम्नतम निविदा निश्चितीसाठी 100 कि.मी. अंतर गृहीत धरुन येणारा दर हा निम्नतम निविदेचा निकष असेल व याबाबत जिल्हाधिकारी सांगली यांचा निर्णय अंतिम असेल. |
| 47 | निविदेमध्ये ज्यांचे दर कमी येतील किंवा जिल्हाधिकारी यांचे वाटाघाटीनंतर जे दर निश्चित होतील त्या दराप्रमाणे महसूल उपविभाग निहाय किंवा तालुका अथवा तालुक्यांच्या गटासाठी निविदाकार नियुक्त करण्याचे अधिकारी जिल्हाधिकारी सांगली यांना असतील. |
| 48 | महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील परिपत्रक विभाग जीएसटी 2017/प्र.क्र.81/कराधान - 1 दि.19 ऑगस्ट 2017 अन्वये **GST** च्या कराच्या बोजाचा विचार करुनच निविदा सादर करण्याबाबत स्पष्ट निर्देश देणेत आलेले आहेत. त्यानुसार निविदाकाराने निविदेचे दर सादर करताना **GST** च्या कराच्या बोजाचा विचार करुनच दर सादर करणेत यावेत. शासनाने **GST** संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले व करण्यात येणारे दर लागु राहतील याची नोंद घ्यावी. |
| 49 | निविदाधारकाचे **PAN** व **GST** रजिस्ट्रेशन आवश्यक असून निविदा धारकाने भरावयाचे दर हे सर्व करासहीत भरणेचे आहे. |

वरील प्रमाणे अ. न. 1 ते 49 अटी व शर्ती मला मान्य व कबूल आहेत.

सांगली                                        स्वाक्षरी

दिनांक- / /2020                                        निविदा धारकाचे नाव व पत्ता

-----------------------------------

**सन 2020-21 व सन 2021-22 (दि.01/01/2021 ते दि.30/09/2022 अखेर) मध्ये पाणी टंचाईग्रस्त गावे / वाडया, वस्त्या खाजगी टँकरने पिण्याचे पाणीपुरवठा करणेकामी दर पत्रक**

................................................................................................................................................

**परिशिष्ट - क**

**दराचा नमुना**

**प्रति,**

**मा. जिल्हाधिकारीसो सांगली**
**(रोजगार हमी शाखा)**

**विषय** - सन 2020-21 व सन 2021-22 (दि.01/01/2021 ते दि.30/09/2022 अखेर) मध्ये पाणी टंचाईग्रस्त गावे / वाडया वस्त्याना पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी खाजगी टँकर/ टाकीसहीत ट्रक भाडयाने पुरविणेबाबत निविदा.

**अर्जदार** - श्री ---------------------------------------------------------------------------------------

रा. ------------------------------- ता. ----------------------------- जि. सांगली

महोदय ,

मी वरील निविदाकार खालीलप्रमाणे सांगली जिल्हयासाठी नमूद केलेले प्रति टँकरसाठी दर देत आहे.

| अ.नं. | वाहनाचा प्रकार | वाहन क्रमांक | क्षमता लिटरमध्ये | वाहनाच्या टाकीची पाणी वाहन करण्याची क्षमता 1 मे टन प्रमाणे दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रति दिन भाडे (रुपये) | प्रति कि.मी. दर (रुपये) |
| 1 | | | | | |
| 2 | | | | | |
| 3 | | | | | |
| 4 | | | | | |
| 5 | | | | | |
| 6 | | | | | |
| 7 | | | | | |
| 8 | | | | | |
| 9 | | | | | |
| 10 | | | | | |

संपर्कासाठी फोन / मोबाईल नंबर
दिनांक - / / 2020

**निविदाकाराची स्वाक्षरी**

## निविदाकाराचे स्वयंघोषणापत्र

..............................................................................................................................

### परिशिष्ट ‘ड’

फॉर्म नं. -
पावती क्र.
दिनांक -
रुपयेः- 5000/-

**विषय** सन 2020-21 व सन 2021-22 (दि.01/01/2021 ते दि.30/09/2022 अखेर) मध्ये सांगली जिल्हयातील पाणी टंचाईग्रस्त गावे / वाडया वस्त्याना पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी खाजगी टँकर/टाकीसहीत ट्रक भाडयाने पुरविणेबाबत निविदा.

..............................................................................................................................

1. निविदाधारकाचे संपूर्ण नाव व पत्ताः-

..............................................................................................................................

2. वाहनाचा प्रकार (ट्रक/टँकर) क्रमांकः-

..............................................................................................................................

3. वाहनाचे क्रमांकः-

..............................................................................................................................

4. वाहनाची क्षमताः-

..............................................................................................................................

सांगली जिल्हयातील पाणी टंचाईग्रस्त भागात टँकरने पाणी पुरवठा करणेसाठी भाडयाने पुरविणेसाठीची सदर जाहीर निविदा जिल्हाधिकारी कार्यालय ( रोजगार हमी शाखा ) यांचेकडील क्र.रोहयो/पाणीटंचाई/आरआर/ /2020 , दि. / /2020 चे पत्राचे अनुषंगाने दि / /2020 च्या दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती. त्या जाहिरातीमध्ये दिलेल्या ऑनलाईन www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक / /2020 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली निविदा मी /आम्ही वाचले त्यावरून मला / आम्हाला सदर निविदा भरणेची इच्छा आहे. त्यासाठी मला / आम्हाला सोबतचे परिशिष्ट ‘ब’ मधील अटी व शर्ती मान्य आहेत. वर नमूद केलेप्रमाणे मी/आम्ही ऑनलाईन निविदा भरलेली आहे. तसेच तांत्रीक **लिफाफा क्र. 1** व दराचा व्यापारी **लिफाफा क्र. 2** असे दोन लिफाफे या निविदेत सादर केले आहेत.

स्थळः सांगली
दिनांक

निविदाकाराची स्वाक्षरी -

निविदाकाराचे नाव व पत्ता -

मोबाईल नंबरः-

**जिल्हाधिकारी कार्यालय, (रोजगार हमी योजना शाखा) सांगली**
**सांगली-मिरज रोड, विजयनगर सांगली**

.....................................................................................................................................

जा.क्र.रोहयो/पाणीटंचाई/आरआर-272/2020 दि.23/12/2020

## ई-निविदा सूचना क्र.1/2020

**सांगली जिल्हयातील टंचाईग्रस्त गावांना / वाडयांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी खाजगी ट्रक / टँकर भाडेतत्वावर पुरविणेबाबत**

सांगली जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांना / वाड्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी खाजगी ट्रक / टँकर भाडेतत्वावर पुरविणेबाबत दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशील |
|---|---|
| 1 | सांगली जिल्हयातील टंचाईग्रस्त गावांना / वाडयांना सन 2020-21 व सन 2021-22 या टंचाई कालावधीत (दि.01/01/2021 ते दि.30/09/2022 अखेर) पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी खाजगी ट्रक / टँकर भाडेतत्वावर पुरविणेबाबत. |

### निविदा प्रक्रियेचे स्वरुप

1) संपुर्ण निविदा प्रक्रिया ही ई-निविदेद्वारे होणार असून निविदा सूचना, अटी व शर्ती इत्यादी माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
2) ई-निविदा फॉर्म किंमत रु.5000/- (अक्षरी र.रु. पाच हजार मात्र) इतकी राहील.
3) बयाणा रक्कम रु.5,00,000/- (अक्षरी र.रु. पाच लक्ष मात्र) इतकी राहील.
4) ई-निविदेसाठी पुरवठादाराकडे / निविदाधारकाकडे डिजीटल सिग्नेचर सर्टिफिकेट (DSC) असणे आवश्यक आहे व त्यांनी निविदा संकेतस्थळावर रजिस्टर होणे आवश्यक आहे. यासाठी निविदाधारकाकडे अधिकृत ई-मेल आयडी असावा.
5) ई-निविदा फॉर्म सुरु होणेचा कालावधी (Download कालावधी) दि.28/12/2020 रोजी सकाळी 11.00 वाजेपासून दि.07/01/2021 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत असेल.
   अ) निविदापुर्व बैठक (Pre-bid Meeting) दि.30/12/2020 वेळ सकाळी 11.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय सांगली रोजगार हमी योजना शाखेत आयोजित करणेत आली असून सदर बैठकीस निविदाधारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहतील.
6) ऑनलाईन निविदा भरणेचा (Upload) कालावधी दि.28/12/2020 रोजी सकाळी 11.00 वाजेपासून दि.07/01/2021 सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत असेल.
7) अर्जाचे शुल्क व बयाणा रक्कम ऑनलाईन स्वीकारणेत येईल.
8) ई-निविदेचा तांत्रिक लिफाफा क्र.1 दि.11/01/2021 रोजी सकाळी 11.00 वाजता मा.जिल्हाधिकारीसो सांगली यांचेपुढे उघडणेत येईल. त्यावेळी सर्व निविदा धारकांनी निविदेसोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या

मुळ प्रतीसह उपस्थित रहावे. काही अपरिहार्य कारणामुळे ही तारीख व वेळ बदललेस याबाबतची सूचना ई-निविदा प्रणालीवर देणेत येईल.

9) तांत्रिक लिफाफ्याचे मुल्यांकन प्रथम करणेत येईल आणि ज्या तांत्रिक निविदा स्विकारार्ह आढळून येतील फक्त अशा निविदांचा आर्थिक (व्यापारी) लिफाफा क्र.2 दि.13/01/2021 रोजी सकाळी 11.00 वाजता उघडणेत येईल.

10) प्राप्त निविदा स्वीकरणे अथवा कोणतेही कारण न देता नाकारणेचे अधिकार जिल्हाधिकारी सांगली यांनी राखून ठेवलेले आहेत.

**(डॉ.अभिजीत चौधरी)**

**जिल्हाधिकारी सांगली**

Signature Not Verified

Digitally signed by VIVEK KALURAM AGAWANE
Date: 2020.12.25 11:26:54 IST
Location: Maharashtra-MH